International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# समाजमाध्यम आणि मराठी भाषा

**डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे**
*श्रीमती एन.एन.सी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा ता.जि. धुळे*
*Corresponding Author - डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे*
DOI - 10.5281/zenodo.10937622

भाषा ही मानवाच्या सामाजिक अस्तित्वाची खूण म्हटली जाते. पृथ्वीवर अनेक प्राणीमात्र वास करतात. परंतु त्यांना मानवासारखा सामाजिक-सांस्कृतिक इतिहास नाही. याचे कारण भाषा. सामाजिक आदान-प्रदानाचे माध्यम, भावनिक ऐक्याचे प्रतीक, सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञानव्यवहार पेलण्याची क्षमता, सृष्टी आणि मानव यांतील आंतरिक देवघेवींचे मध्यस्थ, कला-कल्पनांचे द्रव्य अशा अनेक पातळ्यांवर भाषेवरच माणसाला अवलंबून राहावे लागते. भाषा हे विचार -कल्पना-भावना व्यक्त करण्याचे साधन आहे. भाषेशिवाय संस्कृती अस्तित्वात येऊ शकत नाही. माणसाची अनुभव घेण्याची प्रक्रिया, त्यापाठीमागील त्याचा दृष्टिकोण आणि त्याची अभिरुची या सर्वांच्या खुणा भाषेत आढळतात. भाषा ही मूलत: एक सामाजिक प्रक्रिया असल्यामुळे माणसाच्या सांस्कृतिक इतिहासाती स्थित्यंतरांचा आलेख भाषिक अध्ययनातून मांडता येऊ शकतो. समाज माध्यम आणि भाषा याचा परस्पर संबंध असतो. भाषा अभ्यासक डॉ. रमेश वरखेडे म्हणतात, ‘‘माणसाचा एकंदर भाषिक व्यवहार या सामाजिक माध्यमांतून, सामाजिक पर्यावरणात होत असतो. सामाजिकीकरणाच्या या प्रक्रियेतेच व्यक्ती भाषा शिकत असते. भाषा ही अनेक भाषिक संकेताचा समुच्चय असते आणि हे भाषिक संकेत नेहमीच संदर्भसापेक्ष असतात. त्यामुळे कोणत्या वेळी कोणत्या शब्दांचा प्रयोग, समाजमाध्यमाचा प्रयोग करावा हे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भाने ठरत असते.’’[1] समाज माध्यमातून विचारांची देवाण-घेवाण होताना व्यक्तीजीवनात भाषेला किती अनन्यसाधारण महत्त्व असते, भाषिक संकेतांना किती महत्त्वाचे स्थान असते याची उपयुक्तता वरखेडे यांनी आपल्या विधानातून व्यक्त केली आहे.

समाजमाध्यम आणि मराठी भाषा याचा लोकजीवनात व्यवहारात, ज्ञानजगतात कसा वापर केला जातो त्याला किती अनन्यसाधारण महत्त्व आहे, मानवी जीवनाच्या यशस्वीतेसाठी त्याची किती गरज आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. ही संकल्पना आजच्या पिढीने समजून घेणे गरजेचे वाटते. समाजमाध्यमाचा उपयोग करणे म्हणजे नेमके काय याचीही जाण असली पाहिजे, त्याचा कुठे अन् कसा उपयोग करायचा त्याचे बरे-वाईट

परिणाम हेही समजून घेतले पाहिजे. अलीकडे समाजमाध्यमाचा विध्वंस करण्यासाठी, दंग्या-धोप्यासाठी, अस्थिरता निर्माण करण्यासाठी, अशांतता निर्माण करण्यासाठी वापर केला जातो का? हेही तपासून घेतले पाहिजे.

इंटरनेट, वेब पेज, होम पेज, सोशल नेटवर्क, विकिपीडिया, फ्लिकर, फेसबुक, यु-ट्युब, ट्विटर, टम्बलर, व्हाटस्‌ॲप, अशी ही वेगवेगळी समाजमाध्यमे म्हणता येतील. याचा अलीकडे नवी पिढी वेगाने वापर करताना दिसते. याचा वापर किती चांगला आहे, किती वाईट आहे हा भाग वेगळा परंतु याची उपयुक्तताही नव्या पिढीने समजून घेतली पाहिजे.

**इंटरनेट :**

संगणकाच्या परस्परजोडणीतून साकारलेल्या संदेशवहन व्यवस्थेचे वैश्विक महाजाल म्हणजे ‘इंटरनेट’ होय. डिजिटल माध्यमांतून माहिती संक्रमित करणारा जागतिक महामार्ग असे ‘इंटरनेट’चे वर्णन करण्यात येते. दूरचित्रवाणी, दूरध्वनी आणि पारंपरिक प्रकाशन व्यवस्था त्यांची संमीलन हे या आंतरजालाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. हे महाजाल असंख्य आंतरजोडण्यांतून निरंतर माहिती संक्रमणाचे कार्य करीत असते. या संदर्भात डॉ. रमेश वरखोडे म्हणतात, ‘‘माहिती संक्रमणाच्या या स्वयंचलित व्यवस्थेतूनच आजची ‘नेटवर्क’ प्रणाली विकसित झाली आहे. ब्रिटन व अमेरिकेतील संशोधकांचा यात मोलाचा वाटा आहे. लष्करी आज्ञांचे व्यवस्थापन वा सुसूत्रीकरण करण्यासाठी अमेरिकन एअर फोर्सने संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे.’’[2] डॉ. वरखेडे यांनी इंटरनेट महाजालाचे वैश्विक महत्त्व अधोरेखित केले आहे. सगळ्यात प्रभावी असे समाजमाध्यम म्हणून आज त्याचा सर्व भाषांमध्ये वापर होत आहे. हे लक्षात येते.

**‘वेब पेज’ संकल्पना :**

भाषिकदृष्ट्या हे देखील प्रभावी माध्यम मानले जाते. इंटरनेटच्या वाटचालीत ‘वेबपेज’ संकल्पनेला फार महत्त्वाचे स्थान आहे. वेब ही एक बहुमाध्यम संहिता असते. इंटरनेटच्या आंतरजालावर ती जागतिक पातळीवर कुठेही उपलब्ध असते. आजकाल वेब हे जागतिक व्यापार-व्यवसायाचे आणि सांस्कृतिक व्यवहाराचे माध्यम म्हणून त्याकडे पाहिले जाते. समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून वेबपेजच्या माध्यमातून चालणाऱ्या व्यवहारांचा संदर्भ लक्ष्य वेध घेतल्यास सामाजिक-सांस्कृतिक, भाषिक रचनांचा, प्रवृत्ती विशेषांचा अंदाज बांधता येतो. माहिती संकलन आदी विविध कारणांनी व विविध स्वरुपात वेबपेज निर्मिती केली जाते. यात माहितीचे प्रसारण होते.

होमपेज- वेबपेजेस मध्येच ‘होमपेज’ हे विशेष महत्त्वाचे असते. व्यक्ती, कुटुंब किंवा संस्था निर्मित वेबसाईट हे होमपेजचे अधिष्ठान असते. व्यक्तिगत होमपेजचे दोन प्रकार असतात. एक प्रकारे हा वेबपेज निर्मात्याची थेट ओळख देणारा, त्याच्याविषयी आवश्यक ती माहिती पुरविणारा असतो; तर दुसऱ्या प्रकारात वेबलेखक स्वत:विषयी

थेटपणे फारसा बोलत नसतो. पहिल्या प्रकारात वेबपेज निर्माता वेबसाईटच्या माध्यमातून आपली स्वत:ची एक स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. व्यक्तिगत होमपेजवरून प्रस्तुत केल्या जाणाऱ्या माहितीत व्यक्ती वा संस्थेचा प्राथमिक परिचय हा एक भाग असतो. यात निवास, आणि कार्यस्थळाचा पत्ता, व्यक्तिगत रुची-अभिरुचीविषयी माहिती, छायाचित्रे, सिद्धी-सफलता आणि पुरस्कार याचा तपशील असतो.

भाषा हे दळण-वळणाच्या व्यवहारातील महत्त्वाचे साधन मानले जाते. सोशल नेटवर्क ही संकल्पना तशी 1997 पासून व्यावसायिक सेवांच्या आंतरजालांची मानली गेलेली संकल्पना आहे. व्यापार-उद्योगातील व्यक्तींना व्यावसायिक संबंध जोपासण्यासाठी हे माध्यम महत्त्वाची भूमिका बजावत असते. नेटवर्कच्या सेवाजालाचा उपयोग करवून घेता यावा या हेतूने काही व्यावसायिक ऑनलाईन मंचही स्थापन झाले आहे. या माध्यमातून व्यक्तींना आपल्या गुणवत्तेनुसार व कौशल्यानुसार व्यावसायिक संधीचा आणि साधनस्रोतांचा शोध घेण्याची किमया साध्य झाली. कुठल्याही व्यवसायाला आपल्या आस्थापनेच्या बाहेरच्या व्यापारी माहितीस्रोतांची गरज भासते, ग्राहक लागतात, सेवेची तत्परता वाढते, व्यावसायिक ताण कमी होतो. या माध्यमातून मानवी विकास निश्चित साधला जातो.

**विकीपिडीया :**

सन 2001 साली विकीपिडीया या संकल्पनेचा साधनेचा उदय झाला. ऑनलाईन पद्धतीने माहिती संप्रेषणाचा ज्ञानकोश असे विकिपीडियाचे सर्वसाधारण स्वरुप म्हटले जाते. सहकारी तत्त्वावर ज्ञाननिर्मिती करणारा प्रकल्प म्हणून या ज्ञानकोशाची खरी ओळख म्हटली जाते. सोशल मीडियामध्ये हे महत्त्वाचे माध्यम मानले जाते. शैक्षणिक क्षेत्रात, संशोधनात याचा अधिक वापर होत असतो. विकिपीडियाच्या विकासात विश्वकोशाच्या ज्ञान संकलनासाठी 'knowing' या शब्दाला परवलीचे स्थान प्राप्त झाले आहे. लिहिता-वाचता येणाऱ्या सर्वांच्या मालकीचा सामाईक ज्ञानकोश अशी या विश्वकोशाने आपली ओळख निर्माण केली आहे. समाज माध्यम, प्रसार माध्यमाच्या संदर्भात डॉ. भास्कर शेळके म्हणतात, ‘‘भाषा हेच या माध्यमाचे बलस्थान आहे. मराठी प्रसार माध्यमे, समाज माध्यमे त्यावर होणारा मराठी भाषेचा वापर या अनुषंगाने आपण विचार करायला लागलो की, मराठी प्रसारमाध्यमे मराठी भाषेचा विकास करणार की, भाषेची मोडतोड करून तिचे देशीय अस्तित्व धोक्यात आणणार?’’[3] अशी भीती शेळके यांनी व्यक्त केली आहे. अर्थात या समाजमाध्यमांतर्गत मराठी भाषेचा वापर जपून व सावधतेने आणि अचूक केला पाहिजे असे अपेक्षित आहे.

**फेसबुक, यु-ट्युब, ट्विटर व व्हाटस्ॲप :**

ही समाजमाध्यमे ही मानवी विकासात, परिवर्तनात निश्चितच भर घालणारे आहेत. यामुळे विचारांचे व कल्पनांचे आदान-प्रदान सुव्यवस्थित होण्याला मदत होत असते. ‘फेसबुक’ ही माहिती

वहनाची रचनात्मक व्यवस्था आहे. त्याला सांस्कृतिक कथनांचे आविष्कारमूल्य प्राप्त होते. वाढदिवस, लग्न समारंभ, उत्सव-प्रसंगातले उत्कट क्षण, शालेय जीवनातल्या आठवणी, चरित्रकथा यात आकार घेत असतात. यु-ट्यूबच्या दृष्टीने गुगलच्या सोशल मीडियाच्या व्यावसायिक नीतिमुळे युट्युबच्या आंतरफलकावर नवे बदल केले गेलेले दिसतात. मुलांच्या परिकथांपासून पटकथांपर्यंत कलाकौशल्य, प्रशिक्षणापासून सण-उत्सवाच्या अनुभवपटापर्यंत विविध प्रकारचे दृकश्राव्यपट या समाजमाध्यमावर प्रक्रट होताना दिसते. या संदर्भात डॉ. रमेश वरखेडे म्हणतात, ‘‘असंख्य व्यक्तिगत प्रक्षेपण स्थानांच्या परस्परसंलग्न आंतरजालातून निर्मिती, प्रसारण आणि आशयग्रहणाची लोकानुवर्ती व्यवस्था निर्माण करणे हे यु-ट्युबचे वेगळेपण होते’’[4] समाजमाध्यम म्हणून यु-ट्युब किती महत्त्वाचे स्थान आहे हे डॉ. वरखेडे यांनी सूचित केले आहे.

माहिती तंत्रज्ञान युगात समाजमाध्यमांना खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. अलीकडच्या नव्या पिढीने या तंत्रज्ञानाचा साधनांचा, माध्यमांचा सदुपयोग करून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. मानवी विकासाच्या आणि परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून समाजमाध्यमांचा उपयोग आपल्या स्थानिक भाषेनुसार केला पाहिजे. यात कुठल्याही भाषेचे विशुद्धीकरण होता कामा नये अथवा सामाजिक, धार्मिक दृष्टीने कुठलीही अस्थिरता व अशांतता पसरणार नाही याची काळजी नव्या तरुण पिढीने घेणे गरजेचे आहे. समाजमाध्यम आपल्यासाठी आहे त्याचा वापर मानवी कल्याण, देश कल्याण व राष्ट्र कल्याणासाठी करावा ही सात्विक माणसाची अपेक्षा असते. ही अपेक्षा तरुण पिढी चांगल्या मार्गाने पूर्ण करू शकेल याची खात्री आहे.

समाजमाध्यमातील सायबर संस्कृतीही अगदी गतिमान झालेली दिसते. या संदर्भात डॉ. वरखेडे म्हणतात, ‘‘सार्वजनिक जीवनात मुक्त आणि स्वतंत्र वैचारिक संवाद वाढविण्यासाठी, लोकशाहीचा कणा मजबूत करण्यासाठी सायबर माध्यमेदेखील प्रभावी भूमिका बजावताना दिसतात. ज्ञानकेंद्री समाज आणि ज्ञानाधिष्ठित सत्ताकारण असलेल्या सायबर संस्कृती निर्माणाची प्रक्रिया सुरु झालेली आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.’’[5] एकूणच समाजमाध्यमाचा विचार करताना विश्वातील सायबर संस्कृती किती वेगाने वाढत आहे. त्याचे बरे-वाईट परिणाम लक्षात घेऊन त्याचा योग्य विनियोग मानवी विकासासाठी करणे ही रास्त अपेक्षा त्यांनी व्यक्त केलेली दिसते.

अर्थातच समाजमाध्यम आणि मराठी भाषा याचा मानवी जीवनात आणि दैनंदिन व्यवहारात कसा विनियोग करायचा, कसे अनुसंधान साधायचे ही सर्वस्वी जबाबदारी नव्या पिढीची आहे. म्हणून आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात समाजमाध्यम आणि भाषा याला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे हेही तितकेच खरे.

**निष्कर्ष :**

1. समाजमाध्यम आणि मराठी भाषा याला मानवी दैनंदिन व्यवहारात अनन्यसाधारण महत्त्व आहे.
2. भाषा हे विचार-कल्पना-भावना व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे.
3. 'इंटरनेट' हे जगातील सगळ्यात महत्त्वपूर्ण आणि केंद्रीभूत समाजमाध्यम आहे.
4. 'सोशल नेटवर्क' ही प्रणाली व्यापार-उद्योगातील व्यक्तींना परस्पर संबंध जोपासण्यासाठी महत्त्वाची मानली जाते.
5. सहकारी तत्त्वावर ज्ञाननिर्मिती करणारा प्रकल्प म्हणून 'विकिपीडिया' या ज्ञानकोशाची स्वतंत्र ओळख आहे.
6. समाजमाध्यमातील 'सायबर संस्कृती' ही गतिमान झालेली दिसते.

**संदर्भ ग्रंथ :**


1. डॉ. रमेश वरखेडे, 'समाजभाषा विज्ञान : प्रमुख संकल्पना', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, दुसरी आवृत्ती, फेब्रु-2001, पृ. 33-34.
2. डॉ. रमेश वरखेडे, 'सायबर-संस्कृती', इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज इंजिनिअरींग', नाशिक, प्रथमावृत्ती, 22 डिसेंबर 2015, पृ. 16-17.
3. डॉ. भास्कर शेळके, संपा. 'प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 25 एप्रिल 2012, पृ. 29.
4. डॉ. रमेश वरखेडे, 'सायबर-संस्कृती', इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज इंजिनिअरींग, नाशिक, प्रथमावृत्ती, 22 डिसेंबर, 2015, पृ. 40.
5. तत्रैव, 'सायबर संस्कृती', पृ. 134,135.